# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०८.१०.२४ (मंगळवार)

........................................................................................................................

**पोलीस ठाणे अरोली अवैधरित्या रेती चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोद.**

दि. ०७/१०/२०२४ रोजी रात्री पोलीस ठाणे अरोली येथील पोलीस स्टाफ रवानगी टाकुन पेट्रोलिंग करित असता ठाणेदार स्नेहल राउत यांनी फोनदवारे माहिती दिली की,मौजा घोटीटोक वरून अरोली रोडनी रेतीने भरलेले तिन टिप्पर जात आहे.सदरचे टिप्पर थांबवुन पाहणी करून पुढील कारवाही करावी अशा माहिती वरून चैखाळा फाटा येथे सदर टिप्पर थांबवुन पहाणी केली असता १) टिप्पर क्रं एम एच ४० सी.एम. ६८४५, २) टिप्पर क्रं एम एच ४० सी.एम. ३८६३ ३) टिप्पर क्रं एम एच ४० सी.एम. ३६३९ चे चालकाने सदर तिन्ही ट्रक मध्ये क्षमतेपेक्षा जास्त रेती मिळुन आल्याने तसेच वरील सर्व आरोपीतांनी संगणमत करून तिन्ही ट्रकचा रेती वाहतुक परवाना खोटा व बनावटी बनवुन हे खरा असल्याचे दाखविल्याने विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

१) टिप्पर क्रं एम एच ४० सी.एम. ६८४५ अंदाजे २५,००,०००/ व ८ ब्रास रेती कि.२४,०००/— व चालक नामे सददाम सब्बीर अली सैय्यद वय २८ वर्ष रा.कन्हान याचे ताब्यातुन रेडमी कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल कि. १०,०००/— रूपये.

२) टिप्पर क्रं एम एच ४० सी.एम. ३८६३ अंदाजे २५,००,०००/ व ७ ब्रास रेती कि.२१,०००/— व चालक नामे रिमनलाल बिसरूराम शाहु वय ३९ वर्ष रा.कामठी याचे ताब्यातुन सॅमसंग कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल कि. १०,०००/— रूपये.

३) टिप्पर क्रं एम एच ४० सी.टी. ३६३९ अंदाजे ३५,००,०००/ व १० ब्रास रेती कि.३०,०००/— व चालकनामे सुरेश रामभाउ रोकडे रा. संघर्ष नगर नागपुर

४) चालक नामे अविनाश कृष्णा तायवाडे वय २८ वर्ष रा. खरबी नाका जवाहर नगर भंडारायाचे ताब्यातुन विवो कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल कि. १०,०००/— रूपये.

५) क्लिनर नामे आकाश गुलाब पेंदाम वय २६ वर्ष रा. खरबी नाका जवाहर नगर भंडारा याचे ताब्यातुन आयटेल कंपनीचा साधा मोबाईल कि.२,०००/— रूपये.

६) प्रणय हिरामण कुंभलकर वय २८ वर्ष रा. सेलु ता. कामठी याचे ताब्यातुन विवो कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल कि. २०,०००/— रूपये.

वरिल आरोपींच्या ताब्यातुन एकुण ८६,२७,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्नेहल राऊत, स.पो.नि. ठाणेदार, पोलीस स्टेशन अरोली पोउपनि सुशिल कुमार सोनवाने , पोहवा संदिप बाजनघाडे , पोशि लक्ष्मीकांत मुदनर यांनी केली.



GOODS 435 CARRIER
TATA
श्री साई की दियाली
TATA

# खापरखेडा पोलीस स्टेशन मधुन पळुन गेलेला आरोपी पोलीसांच्या ताब्यात

नागपुर ग्रामीण पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिनांक ०४/१०/२०२४ रोजी पियुष राजबहादुर वर्मा वय १८ वर्ष रा. चनकापुर यांचे कडुन एक देशी कटटा मिळुन आल्याने त्यास अटक करून जेलबंद करण्यात आले होते दिनांक ०५/१०/२०२४ रोजी आरोपी पियुष वर्मा यास तपासकामी बाहेर काढले असता तो मोक्याचा फायदा उचलुन हातातुन हतकडी काढुन पळुन गेला होता. आज दिनांक ०८/१०/२०२४ रोजी बातमीदारा कडुन माहीती मिळाली की, पियुष वर्मा हा पिपळा ते पाटणसावंगी रोडने पायदळ जात आहे. या माहीतीवरून सपोनि घोडमारे, पो.हवा प्रफुल राठोड, शैलेश यादव, पो.शि. शत्रुघ्न वाहाने हे अति तातडीने ठाणेदार यांना माहीती देऊन आरोपी शोध कामी रवाना होऊन पिपळा ते पाटणसावंगी रोडवर आरोपी चा शोध घेत असता आरोपी पियुष वर्मा हा पोलीसांना पाहुन पळु लागला त्याचा पाठलाग करून आरोपीला पकडुन अटक करण्यात आले सदरचा तपास सपोनि स्वाती यावले करित आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा., मा. अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ सा., उपविभागिय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार अरविंदकुमार कतलाम सा. ,स.पोनि फाल्गुन घोडमारे, प्रफुल राठोड, शैलेश यादव, पो.शि शत्रुघ्न वाहाने यांनी पार पाडली आहे.



**पोलीस ठाणे खापा येथे अवैध मुरूम उत्खनन व चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोद.**

दि. २८/०९/२०२४ रोजी मौजा चिचोली वाघोली शिवारा जवळ अवैध मुरमाचे उत्खनन होत असल्या बाबत प्राप्त माहीतीच्या आधारे फिर्यादी नामे राजेश दामोदर घुडे **मंडळ अधिकारी खापा सर्कल** यांनी पथकसह मौकयावर जावुन पाहणी केली असता जेसीबी क्रं.एपी २१ एजी ८०२२ ने मुरमाचे उत्खनन करून व दोन टॅक्टरच्या सहायाने वाहतुक करित असल्याचे दिसुन आले. महसुल पथकास आपल्या कडे येताना पाहुन दोन्ही टॅक्टर चालक हे टॅक्टर घेवुन तसेच जेसिबी चालक हा घटनास्थळावर जेसीबी सोडुन घटनास्थळावरून पळुन गेले मौक्यावरून उत्खनना करिता वापरण्यात आलेला जेसीबी हा वनकायद्या अर्तगत जप्त करण्यात आला मौजा वाघोली तहसिल सावनेर येथील सर्वे क्रं ६७ भोगवटदार सरकार पहाड खडक या जमिनी मधुन विना परवाना अवैद्य रित्या मुरमाचे उत्खनन करून सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले. घटनास्थळावरून जेसीबी क्रं. एपी २१ एजी ८०२२ किमती अंदाजे १०,००,०००/— व १० ब्रास मुरूम किमती अंदाजे १४०००/— रूपये असा एकुण १०,१४,०००/— माल मौकयावर जप्त करण्यात आला असुन फरार जेसीबी चालक गजानन हिरालाल निस्ताने रा. चिचोली दहेगाव (जोशी), तह. पारशिवनी जि. नागपुर  तसेच दोन अज्ञात टॅक्टर चालका विरूध्द पोस्टे खापा येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर**